सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय,बीड.

## (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.0242-222604 E-Mail- rdc.beed2@gmail.com

वाचा :1. आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 30, 31, 34,41 व कलम 51

2.मा.मुख्यमंत्री महोदय यांची दि.12/03/2020 व्हिडिओ कॉन्फरन्स मधील सूचना व निर्देश

3. महाराष्ट्र शासन क्रमांक करोना 2020/प्र.क्र.58/ आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020

4.अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग ,मंत्रालय मुंबई दिनांक 14 मार्च, 2020

5.साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13 मार्च, 2020

6. महाराष्ट्र शासन क्रमांक करोना 2020/प्र.क्र.58/ आरोग्य 5 दिनांक 15 मार्च, 2020

7.या कार्यालयाचे आदेश क्र.2020/आर.बी./डेस्क-1/कावि-फौ.प्र.सं.क.144, दि.23.03.2020.

8. या कार्यालयाचे आदेश क्र.2020/आर.बी./डेस्क-1/कावि-फौ.प्र.सं.क.144, दि.26.03.2020.

मशाका/आपत्ती व्यवस्थापन/कावी
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
क्र.कक्ष/कोरोना विषाणू/2020
बीड दिनांक:-26/03/2020

**आदेश**

ज्याअर्थी राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13 मार्च, 2020 पासून लागू करून खंड 2,3 व 4 मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आली असून स्वातंत्र्यरित्या निर्गमित करण्यात येत आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र.7 व 8 अन्वये कोरोना विषाणूचा राज्यात वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144(1) (3) अन्वये मनाई आदेश परिच्छेद क्र.5 मधील नमुद सुचनांच्या आधिन राहुन दि.24 मार्च, 2020 रोजी रात्री 00.00 वा. पासून ते दि.14 एप्रिल, 2020 चे मध्यरात्री 24.00 वा. पर्यंत नागरी, ग्रामीण व औद्योगिक क्षेत्रात जमाव बंदी आदेश लागू केलेला आहे.

त्याअर्थी साथरोग प्रतिबंधक कायदा 1897 अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीमधील तरतुदीनुसार गर्दी टाळण्यासाठी तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144(1) (3) अन्वये मनाई आदेशाचे उल्लंघन होवू नये यादृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून मी, राहुल रेखावार, अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी बीड पूढील आदेश पारीत करीत आहे. जिल्ह्यात जमावबंदीच्या उक्त कालावधीमध्ये संदर्भिय आदेश क्र.7 व 8 मधील अत्यावश्यक सेवा देण्यात येणारी वाहने (पिण्याचे पाणी पुरवठा, सांडपाणी निचरा व्यवस्थापन, रुग्णालय, पॅथॉलॉजी, लॅबोरेटरी, सर्व प्रकारचे दवाखाने, वैद्यकिय महाविद्यालये, बँक, किराणा सामान दुकानदार, खाद्यतेल/ अन्नधान्ये, दुध/ दुग्ध उत्पादने, फळे, भाजीपाल्याचे वाहन, गॅस, औषधालये, अत्यावश्यक सेवा देणारे शासकिय कर्मचारी, शववाहिका) व सक्षम अधिकारी यांनी परवाना दिलेली वाहने यांना पेट्रोल पंप चालकांनी इंधन पुरवठा करावा. तसेच जमावबंदी कालावधीमध्ये इतर सर्व खाजगी वाहनांना पेट्रोल पंप चालकांनी इंधन पुरवठा करु नये. तसेच खाजगी टू-व्हिलर व फोर-व्हिलर धारकांना जमावबंदीच्या कालावधीमध्ये रस्त्यावर फिरण्यास सक्त बंदी/ मनाई करण्यात येत आहे.

उपरोक्त आदेशाचे अवज्ञा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अथवा संस्थेने भारतीय दंडसंहिता 1860 (45) याच्या कलम 188 शिक्षेसपात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल आणि ईतर कलमांसह दिवाणी व फौजदारी कार्यवाही करण्यात येईल.

26/03/20

(राहुल रेखावार, I.A.S)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,बीड

प्रती -1.सर्व विभाग प्रमुख ------------------------------------------ जिल्हा बीड

प्रत - 1.मा. विभागीयआयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांचे कडेस माहितीस्तव सविनय सादर.

2.पोलिस अधिक्षक, बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

3.जिल्हा माहिती अधिकारी, माहिती कार्यालय बीड यांनी वरीलप्रमाणे तात्काळ प्रेस नोट प्रसिद्ध करावी.